# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.

दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com


क्र. कोविमं/ए-२/ १२ वी गोप./प्रात्य./तोंडी/ 2861
कोल्हापूर ४१६ ००४
दिनांक: १७ /०१/२०२४.

प्रति,
प्राचार्य,
कोल्हापूर विभागीय मंडळ कक्षेतील,
सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा, सांगली, कोल्हापूर.

विषय :- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा(इ.१२ वी फेब्रु./मार्च-२०२४
लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा वेळापत्रकाबाबत......

संदर्भ :- १.राज्य मंडळाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-६/४८५३, दिनांक ०१.११.२०२३ चे पत्र.
२.कार्यालयीन टिप्पणी मंजूरीचा दिनांक -०१-२०२४.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, फेब्रु./मार्च-२०२४ मध्ये होणा-या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा(इ.१२ वी) खाली नमूद केलेल्या कालावधीत आयोजित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | परीक्षेचा तपशील | परीक्षेचा दिनांक |
|---|---|---|
| ०१ | **प्रात्यक्षिक,श्रेणी,तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा** | **शुक्रवार दिनांक ०२ फेब्रुवारी,२०२४ ते मंगळवार दिनांक २० फेब्रुवारी, २०२४** |
| ०२ | **NSQF अंतर्गत व्यावसायिक E-३,E-६,F-६ व F-८ तसेच G-१ ते G-९ विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा** | **शुक्रवार दिनांक ०२ फेब्रुवारी,२०२४ ते मंगळवार दिनांक २० फेब्रुवारी, २०२४** |
| ०३ | **लेखी परीक्षा** | **बुधवार दिनांक २१ फेब्रुवारी,२०२४ ते मंगळवार दिनांक १९ मार्च, २०२४** |
| | **आऊट ऑफ टर्न परीक्षा** | |
| ०४ | **प्रात्यक्षिक, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन व NSQF अंतर्गत व्यवसायिक विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा** | **बुधवार दिनांक २० मार्च,२०२४ ते शुक्रवार दिनांक २२ मार्च, २०२४** |
| ०५ | **I.T. विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा** | **शनिवार दिनांक २३ मार्च,२०२४** |
| ०६ | **G.K. विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा** | **मंगळवार दिनांक २६ मार्च, २०२४** |

**परीक्षेसंदर्भात महत्वाच्या सूचना खालीलप्रमाणे-**

प्रात्यक्षिक परीक्षा निर्धारीत कालावधीत पार पाडण्याच्या दृष्टीने कनिष्ठ महाविद्यालयातील परीक्षार्थींची संख्या व प्रयोगशाळा क्षमतेनुसार परीक्षार्थ्यांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेवून त्याप्रमाणे नियोजन/वेळापत्रक तयार करण्यात यावे. सदर वेळापत्रक कनिष्ठ महाविद्यालयाच्या दर्शनी भागात लावावे. **प्रात्यक्षिक परीक्षेच्या कालावधीत भरारी पथक हे भेटी देणार असल्याने दिनांकनिहाय तयार करण्यात आलेल्या वेळापत्रकाप्रमाणेच प्रात्यक्षिक घेण्यात यावी. तसेच आपण दिनांकनिहाय तयार केलेल्या वेळापत्रकाची एक प्रत विभागीय मंडळ कार्यालयाकडे पाठविण्यात यावी.**

फेब्रुवारी/मार्च-२०२४ परीक्षेसाठी मंडळामार्फत गणित/भौतिकशास्त्र/रसायनशास्त्र/जीवशास्त्र, बायफोबल, एम.सी.व्ही.सी. व आय.टी. विषयासाठी अंतर्गत/बहिस्थ परीक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली आहेत. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात शिकवत असलेल्या विषयाच्या व ज्या विषयासाठी मंडळामार्फत अंतर्गत/बहिस्थ परीक्षक नेमले आहेत त्यांची नांवे सोबत संगणकीकृत यादीद्वारे देण्यात आलेली आहेत.

अ) As A Internal- म्हणून जी नांवे दिलेली आहेत ते शिक्षक आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाकडे अंतर्गत(Internal) परीक्षक म्हणून काम पाहतील. त्यामध्ये ज्या विषयासाठी नांवे प्राप्त झालेली नाहीत, अशा विषयासाठी College teacher असे नमूद केले आहे. त्यानुसार आपण आपल्या स्तरावर विषय शिकविणा-या शिक्षकांची अंतर्गत परीक्षक म्हणून नियुक्ती करावी.

ब) Going To as an External- आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांची नांवे दर्शवून त्यांच्यासमोर ज्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये ते बहिस्थ(External) परीक्षक म्हणून परीक्षा घेणार आहेत त्या कनिष्ठ महा.चे नांव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक देण्यात आलेले आहेत.

क) Coming from as an External- आपल्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये बहिस्थ(External) परीक्षक म्हणून येणारे शिक्षक यांची कनिष्ठ महाविद्यालयाचा क्रमांक व विषय क्रमांक, परीक्षकाचे नांव कनिष्ठ महा.चे नांव,पत्ता दूरध्वनी क्रमांक देण्यात आलेले आहेत.

तरी उपरोक्तप्रमाणे नियुक्त्या केलेल्या आहेत. आपण संबंधित परीक्षकांशी तसेच संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाशी संपर्क साधून जेणेकरुन दोन्ही कनिष्ठ महाविद्यालयांची परीक्षा नियोजनाबाबत अडचण येणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच निर्धारित वेळेत परीक्षेच्या बॅचेस तयार करुन नियोजन करावे. तसेच बायफोकल व एम.सी.व्ही.सी. या विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा प्रचलित पध्दतीप्रमाणे निर्धारित वेळेत पूर्ण करण्यात यावी.

आपल्याकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी ०१ अंतर्गत + ०१ बहिस्थ अथवा उपलब्ध माहितीच्याआधारे शिक्षकांच्या नियुक्त्या केलेल्या आहेत. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या ज्यादा असल्यास व निर्धारित वेळेत परीक्षा पूर्ण करुन घेणे आवश्यक असल्यामुळे एक अंतर्गत/ बहिस्थ परीक्षकांकडून परीक्षा घेणे शक्य होत नसल्यास तसेच उपरोक्त विषयास मंडळामार्फत अंतर्गत व बहिस्थ परीक्षकांची नियुक्ती झाली नसल्यास आपल्या स्तरावर अंतर्गत/बहिस्थ परीक्षकांची नजिकच्या कनिष्ठ महाविद्यालयातील विषय शिकविणा-या शिक्षकांची नियुक्ती करुन परीक्षा निर्धारित वेळेत पूर्ण करुन घेण्यात यावी. **तथापि ही कार्यवाही करताना सदर बाब मंडळास लेखी स्वरुपात निदर्शनास आणावी. शक्य असल्यास मंडळाची मान्यता घ्यावी.** कोणत्याही परिस्थितीत मंडळाने नियुक्त केलेल्या अंतर्गत/ बहिस्थ परीक्षकांकडूनच परीक्षा घेण्यात यावी. परस्पर आपल्या स्तरावर बाहय परीक्षकांची नियुक्ती करुन परीक्षा घेण्यात येवू नये. असे जर मंडळाच्या निदर्शनास आले तर आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाविरुध्द मंडळाकडून नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

तसेच प्रात्यक्षिक परीक्षेसंदर्भात सुविधेबाबत बहिस्थ परीक्षकांनी सादर करावयाचे गोपनीय अहवालाचे प्रपत्र प्रात्यक्षिक परीक्षेच्या साहित्यासोबत आपणास देण्यात येणार आहेत. तो अहवाल संबंधित बहिस्थ परीक्षकांकडे देण्यात यावा व तो गोपनीयरित्या भरुन स्वतंत्र बंद पाकिटात व पाकिटावर विषयाचे नांव व आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाचा क्रमांक व गोपनीय असे लिहून पाकिट बंद करुन त्यावर बहिस्थ परीक्षकांची स्वाक्षरी घ्यावी व ते पाकिट आपल्याकडे जमा करुन घ्यावे व सदरचे गोपनीय अहवालाचे पाकिट गुणपत्रिकेच्या पाकीटासोबत मंडळास सादर करावे.

आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील परीक्षार्थ्यांचे बैठक क्रमांकनिहाय ऑनलाईन पध्दतीने नोंदविलेल्या गुणांची Final Printout घेवून त्यावर अंतर्गत व बहिस्थ परीक्षकांची स्वाक्षरी(आवश्यक त्या विषयांच्याबाबत) व तोंडी, अंतर्गत मूल्यमापन, श्रेणी इत्यादी गुण तक्त्यानुसार संबंधित विषय शिक्षकांची स्वाक्षरी घेवून सदर गुण तक्त्यावर प्राचार्य यांनी कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्का उमटवून स्वाक्षरी करावयाची आहे व सदरचे गुणतक्ते विभागीय मंडळाकडे निर्धारित तारखेस प्रचलित पध्दतीप्रमाणे सिलबंद पाकिटामध्ये, पाकिटावर कनिष्ठ महाविद्यालयाचा नांव, सांकेतांक क्रमांक घालून वितरण केंद्रावर जमा करावयाचे आहेत. तसेच गुणतक्त्याची एक प्रत कनिष्ठ महाविद्यालयात माहितीस्तव जतन करणे आवश्यक आहे.

प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी, अंतर्गत मूल्यमापन परीक्षा नियमित कालावधीमध्ये देवू न शकलेल्या परीक्षार्थ्यांसाठी सदरची परीक्षा Out of Turn लेखी परीक्षेनंतर राज्य मंडळाने कळविलेल्या वेळापत्रकानुसार आयोजित करण्यात येईल.

नियमित कालावधीमध्ये जे परीक्षार्थी गैरहजर राहिलेल्या आहेत अशाच परीक्षार्थ्यांचे बैठक क्रमांक सदर Out of Turn परीक्षेसाठी ज्या त्या कनिष्ठ महाविद्यालयात उपलब्ध करुन दिले जातील. सदर परीक्षार्थ्यांचे गुण ऑनलाईन पध्दतीने *Out of Turn Marks* या Option द्वारे नोंदविण्याची कार्यवाही कनिष्ठ महाविद्यालयांनी नियमित परीक्षार्थी प्रमाणेच Maker व Checker Login चा वापर करुन करावयाची आहे.

Out of Turn परीक्षेमध्ये बसलेल्या परीक्षार्थ्यांचे गुणतक्ते व प्रात्यक्षिक परीक्षेचे साहित्य हे Out of Turn परीक्षा संपल्यानंतर **बुधवार दिनांक २७.०३.२०२४** रोजी स्वखर्चाने हस्तपोच मंडळ कार्यालयात आणून दयावीत. सदर तारखेस Out of Turn चे साहित्य प्राप्त न झाल्यास परीक्षार्थ्यांच्या होणा-या नुकसानीस आपण जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी.

तसेच श्रेणी विषयाची Out of Turn परीक्षा घेण्यात येत नाही, याची सर्व कनिष्ठ महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.

अंतिविलंब शुल्काच्या मुदतीमध्ये आवेदनपत्रे भरलेल्या व गुणांच्या Online System मध्ये ज्या परीक्षार्थ्यांचे बैठक क्रमांक (Additional Seat No.) उपलब्ध झालेले नाहीत. अथवा विषयबदल केला आहे अशा सर्व परीक्षार्थ्यांचे गुण प्रचलित पध्दतीने (कनिष्ठ महाविद्यालयाच्या लेटरहेडवर)निर्धारित तारखेस वितरण केंद्रावर जमा न करता विभागीय मंडळाकडे स्वखर्चाने हस्तपोच जमा करावयाचे आहे.

**(सुभाष रा.चौगुले),**
**विभागीय सचिव**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**